<u>नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२५</u>
<u>वामन वि. शोभा व ईतर</u>

-:: <u>नि.क्र.१० लगत आदेश</u> ::-

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. दोन्ही पक्षांनी तडजोडपत्र दाखल केले आहे. माझे पूर्व न्यायीक अधिकारी यांनी सदर तडजोडपत्राच्या कायदेशीरपणाबाबत युक्तिवाद करावा असा दि.२१/०४/२०२५ रोजी आदेश केलेला आहे. प्रकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता याच पक्षकारांनी यापूर्वी नि.दि.दा.क्र.६८/२०१९ मध्ये दावा मिळकतीबाबत तडजोडपत्र करून दावा मिळकतीचा धारक कोन असेल हे ठरविलेले आहे. असे असताना सुद्धा प्रस्तुत दाव्यामध्ये दावा दाखल करण्याचे कारण स्पष्ट होत नाही. त्यामुळे दावा संगनमताने दाखल केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यथास्थितीत, दाव्यामध्ये पुन्हा तडजोड करता येईल काय? याबाबत युक्तिवाद होणे आवश्यक आहे. सबब दोन्ही पक्षांनी हजर राहून त्यावर युक्तिवाद करावा जेणेकरून दाव्यामध्ये प्रगती होईल.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.08.29 17:14:17 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २९–०८–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**